# लेखकाचा परिचय



दीपक शिकारपूर

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावर दीपक शिकारपूर हे नाव आदराने व बहुमानाने घेतले जाते. आपल्या उंच्यापुऱ्या व भारदस्त व्यक्तिमत्त्वाने ते सर्वांवर सहज छाप पाडतात. पण मराठी भाषिकांना त्यांची ओळख त्यांच्या सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाने व विविध व्याख्यानमालेतील सहभागामुळे आहे.

आपल्या शालेय व उच्च शिक्षणात वरच्या क्रमांकाने उत्तीर्ण होणारे श्री. दीपक शिकारपूर यांनी अभियांत्रिकी पदवी व व्यवस्थापकीय पदव्युत्तर शिक्षण घेतले व आपल्या व्यावसायिक कारकीर्दीचा श्रीगणेशा टेल्को इथे सुरू केला. सुमारे १५ वर्षे टाटा उद्योगसमूहात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्यावर त्यांनी जागतिक दृष्टी व स्थानिक अंमलबजावणी अशी अभिनव वाट चोखाळण्यासाठी एक कल्पक मार्ग शोधला. 'डायमेन्शन उद्योगा'चे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, 'विश्वकर्मा व सूर्यदत्ता शिक्षण संस्थे'चे कार्यकारणी सदस्य, 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स'च्या 'माहिती तंज्ञत्रान समिती'चे अध्यक्ष, कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाच्या 'माहिती तंत्रज्ञान' विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष, 'पुणे व्यासपीठ', 'सी.आय.आय.संस्थां'चे सदस्य इ० सामाजिक संस्थांत ते विविध

जबाबदाऱ्या सांभाळत आहेत.

आपल्या व्यावसायिक वाटचालीत त्यांना विविध पारितोषिके मिळाली आहेत. कॉसमॉस पुरस्कार, वीर सावरकर पुरस्कार, लायन्स विशेष गुणवत्ता पुरस्कार, 'सिटाडेल प्रभावी व्यक्तिमत्त्व' ही काही महत्त्वाची नामोल्लेख करण्यासारखी उदाहरणे. वरील सर्व पदे व पुरस्कार आजपर्यंत ज्यांना मिळाले, त्या सर्वांपेक्षा तरुण वयात हे पुरस्कार मिळवून त्यांनी एक मानदंड निर्माण केला आहे. ज्ञान, अभिनवता व कल्पकता या गुणांच्या जोरावर त्यांनी हे स्थान मिळवले आहे.

वरील वाटचाल करताना व त्यात भरघोस यश मिळवतानाच मराठी भाषिकांसाठी आपल्या मातृभाषेत सोप्या भाषेत ज्ञानाचा प्रसार विविध माध्यमांद्वारे करताना त्यांनी एक वेगळाच वस्तुपाठ तरुण पिढीला घालून दिला आहे. गेल्या दशकात २९हून अधिक देशांना भेटी देणाऱ्या दीपकनी परदेशी कायमस्वरूपी वास्तव्य (सहज शक्य असतानाही) टाळून मराठी प्रदेश, मराठी भाषा व मराठी माणूस यांच्यासाठी आपले कार्य सीमित केले आहे. यापूर्वी त्यांनी 'माहिती तंत्रज्ञान' विषयी ७ पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी ५ पुस्तकांना महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

व्यावसायिक धडाडी, सामाजिक जबाबदारी व औदार्य या सर्वांची योग्य सांगड घालणारे व काही विशिष्ट ध्येयधोरणे डोळ्यांसमोर ठेवून कार्यरत असणारे श्री. दीपक शिकारपूर कौतुक व अभिनंदनास पात्र आहेत.

पत्ता :
**दीपक शिकारपूर**
बी-बी/२५, स्वप्नशिल्प,
गांधी लॉन्सशेजारी, गणेशनगर,
कोथरूड, पुणे ४११ ०३८.
www.deepakshikarpur.com